<u>**सिमा जाधव वगैरे वि. सचिन जाधव वगैरे**</u>

<u>**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र. ४२/२०२३ मधील निशाणी क्र. ५ वरील आदेश**</u>

कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ कलम १२ नुसार अर्जदार हिने सामनेवाला क्रमांक १ यांच्याकडून तिच्या व मुलीच्या उदरनिर्वाहासाठी प्रती अंतरीम पोटगी महिना रुपये २०,०००/– व घरभाडयाकरीता प्रती महिना रुपये ५,०००/– मिळण्यासाठी हा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्ज व सामनेवाला याचे म्हणणे अवलोकन केले. अर्जदार व सामनेवाला तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

३. अर्जदार हिने असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र. १ ची अर्जदार ही पत्नी आहे व त्यांना नम्रता ही मुलगी आहे. लग्नानंतर सामनेवाला क्र. १ ते ३ यांनी अनेक कारणास्तव अर्जदार हिचा शारीरीक व मानसिक छळ करुन कौटूंबिक हिंसाचार केला. तसेच अर्जदार क्र.१ तिचे मुलीसह बरेचदा सामनेवालाकडे नांदायला गेली असता सामनेवाला याने अर्जदार हिस घरात घेतले नाही. त्यानंतर अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला नं.१ यांना वारंवार नांदावयास न्यावे म्हणून फोन केले. परंतु, सामनेवाला नं.१ यांनी अर्जदारास नांदावयास नेले नाहीच याउलट दि.०६/०५/२०२३ रोजी अर्जदाराच्या नणंदा विदया, संध्या व शोभा दुपारी ०१.०० वाजता रहिमतपुर येथील अर्जदाराच्या माहेरील घरी आल्या व अर्जदारास तु नव–याला फोन करुन सारखे नांदावयास न्या म्हणून मागे का लागली आहे. म्हणून अर्जदारास शिवीगाळ करुन हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच अर्जदाराच्या आई वडीलांना शिवीगाळ केली.

अर्जदार व तिची मुलगी तिचे माहेरी रहात असून आश्रीतासारखे जीवन जगत आहे. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार व तिच्या मुलाच्या अन्न, वस्त्र व निवारा याची कोणतीही सोय केलेली नाही. सामनेवाला यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. सामनेवाला यांना पुसेगाव येथे ८ एकर बागायती जमीन असून त्यापासून त्यांना वार्षीक ८ ते १० लाख इतके उत्पन्न मिळते. असे असताना देखील सामनेवाला क्र. १ याने अर्जदार व तिच्या मुलीच्या उदरनिर्वाहाची कोणतीही तजवीज केलेली नाही. त्यामुळे, अर्जदाराने प्रस्तुतचा अंतरीम पोटगीचा अर्ज दाखल केला आहे.

४. सामनेवाला क्र. १ ते ३ यांनी असे कथन केले आहे की अर्जदाराचा संपूर्ण अर्ज व त्यामधील संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असुन ते सामनेवाला यांना मान्य व कबुल नाही.

५. अर्जदार यांचे अर्ज कलम १ मधील " अर्जदार व सामनेवाला नं. १ यांचा विवाह दि.३१/५/२०१५ रोजी हिंदु धर्म रितीरिवाज व परंपराप्रमाणे मुक्ताई मंगल कार्यालय रहिमतपूर, ता. कोरेगांव येथे झाला आहे. " एवढा मजकुर सोडुन उर्वरीत संपूर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असुन तो या सामनेवाला यांना मान्य व कबुल नाही. लग्नाचा निम्मा निम्मा खर्च हा अर्जदार नं. १ व सामनेवाला नं. १ याचे आई वडीलांनी केलेला आहे. तसेच अर्जदार नं. १ हिस संसार उपयोगी साहित्य दिलेले आहे. लग्नामध्ये सामनेवाला नं. २ व सामनेवाला नं. १ यांचे वडीलांनी अर्जदार नं. १ हिस मणिमंगळसूत्र घातलेले होते. अर्जदार नं. १ हिस सामनेवाला नं. २ व त्यांचे वडीलांनी साडेसहा तोळे मणिमंगळसुत्र (मोठे) मणी मंगळसुत्र १ तोळा व सोन्याची अंगठी ४ ग्रॅम घातलेली आहे.

६. सामनेवाला याने पुढे असे कथन केले की, अर्जदारचे अर्ज कलम २ मधील संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असुन तो या सामनेवाला यांना मान्य व कबुल नाही. लग्नानंतर अर्जदार नं. १ ही सामनेवाला नं. १ याचे घरी मौजे पुसेगांव या ठिकाणी नांदणेस आली. सुरुवातीचे काही महिनेच सामनेवाला नं. १ सोबत अर्जदार नं. १ ही व्यवस्थित नांदली आणि काही दिवसानंतर किरकोळ कारणावरून सामनेवाला नं. १ ते ३ त्याचे वडील भावजय यांचेबरोबर वारंवार अर्जदार नं. १ ही भांडणतंटा करीत होती. परंतु सामनेवाला नं. १ यांनी अर्जदार नं. १ हिचेबरोबर संसार करणेची प्रामाणिक इच्छा असल्याने हे सर्व सहन केले. तसेच सामनेवाला नं. १ यांच्या बहिणी विदया, संध्या, शोभा, प्रेमा, वैशाली या केवळ पुसेगांव यात्रेच्या वेळी व पै पाहुण्याचे कार्यकम असल्यानंतरच येतात तसेच त्या कधीही येवुन जावुन राहत नसतात. परंतु अर्जदार नं. १ हिस पाहुणचार करावा लागेल. तसेच त्याच्यासाठी स्वयंपाक, चहापाणी करावा लागत होता. त्यामुळे त्यांचेवर खोटे आरोप केलेले आहेत. त्यामुळे या कारणावरूनही अर्जदार यांचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा ही विनंती.

७. सामनेवाला याने पुढे असे कथन केले की, अर्जदार यांचे अर्ज कलम ३ व ४ मध्ये नमुद केलेला संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असुन तो या सामनेवाला यांना मान्य व कबुल नाही. अर्जदार नं. १ ही सन २०१६ मध्ये सामनेवाला व त्यांचे कुटुंबातील व्यक्तीना कोणतीही कल्पना व माहिती न देता निघुन गेली ती सामनेवाला नं. १ व त्यांचे कुटुबांतील लोकांनी अनेकवेळा प्रयत्न करूनही अर्जदार नं.१ ही सामनेवाल्याची घरी कशीबशी नांदणेस आली. सामनेवाला नं. १ व अर्जदार नं. १ हिस

अर्जदार नं. २ मुलगी नम्रता हिचा कोरेगांव येथील डॉ. मिलिंद शहा या हॉस्पीटलमध्ये जन्म झाला व दवाखान्याचा संपुर्ण खर्च व बिल हे सामनेवाला नं. १ यांनी दिलेला होता व आहे. तसेच अर्जदार नं. २ मुलगी नम्रता हिचे बारशे हे मौजे रहिमतपुर अर्जदार नं. १ हिचे माहेरी सप्टेंबर २०१६ मध्ये झाले. अर्जदार नं. २ नम्रता हिचे बारशास सामनेवाला नं. १ ते ३, सामनेवाला नं. १ चे वडील भावजय, बहिणी गेलेल्या होत्या. परंतु बारशे झालेनंतर अर्जदार नं. १ ही सामनेवाला नं. १ यांचे घरी मौजे पुसेगांव या ठिकाणी नांदणेस सामनेवाला नं. १ ते ३ व त्यांचे कुटुंबातील व्यक्तीच्या विनवणीमुळे कशीबशी सासरी आली. परंतु अर्जदार नं.२ मुलगी नम्रता हिस बारशास भेटलेल्या भेटवस्तु, खेळणी, कपडे, सोन्याचे व चांदीचे दागिने हे अर्जदार नं. १ हिने तिचे माहेरी मौजे रहिमतपुर येथे तिचे आई वडीलांचेकडे ठेवलेले होते व आहे. ते कधीही सामनेवाला नं. १ ते ३ व त्याचे कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीकडे दिलेले नाही. सबब या कारणावरून अर्जदाराचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

८. सामनेवाला याने पुढे असे कथन केले की, अर्जदार यांचे अर्ज कलम ५ व ७ मधील संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असुन तो या सामनेवाला यांना मान्य व कबुल नाही. सामनेवाला नं. १ याचे वडील यांना कधीही पक्षघाताच्या विकाराचा त्रास नव्हता व नाही. सामनेवाला नं. १ याने अर्जदार नं. १ हिस अनेकवेळा नांदणेसाठी प्रयत्न करून कशीबशी नांदणेस आलेली होती. परंतु अर्जदार नं. १ हिचे वागणेत कोणताही बदल झाला नाही. त्यावेळी सामनेवाला नं. १ ते ३ त्यांचे कुटुंबातील व्यक्तीना आत्महत्या करण्याची धमकी दिली. परंतु सामनेवाला व त्याचे कुटुंबातील व्यक्तीनी

अर्जदार नं. १ हिची सर्व कृत्ये सहन करून नांदवित होते. परंतु मार्च २०१७ रोजी अर्जदार नं. २ मुलगी नम्रता हिचेसह सामनेवाला व त्याचे घरातील व्यक्तीना न सांगता मार्च २०१७ रोजी अर्जदार नं. १ ही निघुन गेली ती परत नांदणेस आलेली नाही. सामनेवाला यांनी व त्यांचे घरातील कुटुंबांनी अर्जदार नं. १ हिस मुलीप्रमाणे वागणुक दिली. तिचा सन्मान केला सामनेवाला नं. १ व त्याचे कुटुंबातील व्यक्तीनी अर्जदार नं. १ याचे विचित्र वागणे सहन केले व अर्जदार नं. १ हिस व्यवस्थित नांदवले. याउलट अर्जदार नं. १ ही मार्च २०१७ मध्ये माहेरी निघुन जाणेपुर्वी सामनेवाला नं. १ याची चुलत बहिण मालती द्वारकनाथ जगताप ही मुंबईहुन लग्नासाठी आली. त्यावेळी मालती ही सामनेवाला यांचे घरी मौजे पुसेगांव येथे मुक्कामी राहिली असता तिचे पैसे अर्जदार नं. १ हिने चोरले. त्याचप्रमाणे सामनेवाला नं. १ चा भाचा शुभम चंद्रकांत कदम याचे सुध्दा पैसे अर्जदार नं. १ हिने चोरले. त्यामुळे अर्जदार नं. १ ही घरामध्ये चोरीचे प्रकार वारंवार करू लागली. परंतु सामनेवाला नं. १ यांनी व पै पाहुणे यांनी कुटुंबाची बदनामी होवु नये म्हणुन पोलीस स्टेशनला तक्रार केली नाही. तसेच अर्जदार नं.१ ही सामनेवाला नं. १ व त्यांचे कुटुंबाला धमकावु लागली व मानिसक त्रास देवु लागली. परतु सामनेवाला नं. १ अगर त्याचे कुंटुंबातील कोणत्याही सदस्य अर्जदार नं. १ हिस एका शब्दानेही बोलले नाहीत अगर रागावले नाहीत. असे असताना अर्जदार नं. १ यांनी अर्ज कलम ६ मध्ये केलेली शिवीगाळ व मारहाणीची केलेली कथने चुकीच्या पध्दतीने व सामनेवाला व त्यांचे कुटुंबाला त्रास देणेचे हेतुने दिलेली आहेत. तसेच सामनेवाला नं. १ हा शेतकरी असुन सामनेवाला नं. १ हा निर्व्यसनी व आध्यात्मिक मुनष्य आहे. तसेच सामनेवाला

याचे घर हे श्री सेवागिरी मंदिरासमोर आहे. त्यामुळे सामनेवाला नं. १ हे जबाबदारीने वागणारी व्यक्ती आहे याची माहिती अर्जदार नं. १ यांना होती व आहे. परंतु बिनबुडाचे आरोप अर्जदार नं. १ हिने सामनेवाला नं. १ यांचेविरुध्द केलेले आहेत. तसेच अर्जदार नं. १ ही तिचेजवळचे असणारे सुवर्ण अंलकारास कधीही सामनेवाला नं. १ ते ३ व त्यांचे कुंटुंबातील कोणत्याही सदस्यास साधा हातही लावुन देत नसत. त्यामुळे सामनेवाला नं.२ यांचेकडे दागिने देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे अर्जदार नं. १ हिने सामनेवाला व त्याचे कुटुंबाविरुध्द विनाकारण बिनबुडाचे आरोप केलेले आहेत. सबब या कारणावरूनही अर्जदार यांचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा ही विनंती केली आहे.

९. सामनेवाला याने पुढे असे कथन केले की, अर्जदार अर्ज कलम ८ ते ११ मधील संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असुन तो या सामनेवाला यांना मान्य व कबुल नाही. सामनेवाला यांचे घरी एकेदिवशी अर्जदार नं. १ चे चुलते जगन्नाथ निवृत्ती पवार व अर्जदार नं. १ चा भाउ घरी आले असता अर्जदार नं. १ हिने अर्जदार नं. २ मुलगी नम्रता हिस फरशीवर जोरात फेकले त्यावेळी मुलगी नम्रता हिच्या डोक्यास मार लागला. त्यावेळी सामनेवाला नं. १ चे भाउ व भावजय या अर्जदार नं. २ मुलगी नम्रता हिस दवाखान्यात घेवुन गेले असता अर्जदार नं. २ मुलगी नम्रता हिस २४ तासात उलटी झालेस अडमीट करावे लागले असे सांगितले. त्यावेळी अर्जदार नं. २ नम्रता हिस औषधोपचार सामनेवाला नं. १ चे भाउ व भावजय यांनी केला. अशा प्रकारची कृत्ये माथेफिरूचे प्रकार अर्जदार नं. १ ही वारंवार करीत होती. त्यामुळे सामनेवाला नं. १ व त्यांचे कुटुंबातील व्यक्तीचे मध्ये भितीचे वातावरण घरामध्ये तयार झाले होते. अर्जदार नं.

१ हिचे आई व वडील सामनेवाला नं. १ याचे घरी आले. त्यावेळीही कोणतेही कारण घडले नसताना सामनेवाला नं. ३ याचे अंगावर अर्जदार नं. १ ही धावून आली. परंतु अर्जदार नं. १ हिचे आई वडील हे काहीही अर्जदारास बोलले नाहीत. तसेच अर्जदार नं.१ ही सामनेवाला नं. १ व त्यांचे कुटुंबातील लोकांना आत्महत्या करण्याची धमकी देत असे. सामनेवाला नं. १ यांची भावजय व भाउ यांनी अर्जदार नं.१ हिस अर्जदार नं. २ मुलगी नम्रता हिचेविषयी माहिती अगर चौकशी केली असता अर्जदार नं. १ हिस आवडत नसे. सतेच अर्जदार नं. १ ही वारंवार उलट सुलट बोलत असत. त्यामुळे अर्जदार नं. १ हिचे अशा वागण्यामुळे सामनेवाला नं. १ ते ३ व त्यांचे कुटुंबास खुप मानसिक त्रास सहन करावा लागला, अर्जदार नं. १ हिस सामनेवाला यांनी नांदणेसाठी सामनेवालाचे कुटुंबातील गावातील पै पाहुणे, यांचामार्फत कसोटीचे प्रयत्न केले.

१०. सामनेवाला याने पुढे असे कथन केले की, अर्जदार नं. १ ही मार्च २०१७ मध्ये अर्जदार नं. २ मुलगी नम्रता हिस सामनेवाला नं. १ व त्याचे कुटुंबातील सदस्यांना न सांगता घरातील साहित्य घेवुन निघुन गली ती अनेकवेळा प्रयत्न करूनही नांदणेस आली नाही. उलट कोणतेही कारण घडलेले नसताना सामनेवाला नं. १ यांना नाहक मानसिक, आर्थिक त्रास देणेचे हेतुने सदरचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यामुळे सामनेवाला नं. १ यांना अर्जदार हिचे विरुध्द नाईलाजास्तव विवाह विच्छेदन होवुन मिळणेसाठी अर्ज दाखल करणेस भाग पडलेले आहे. अशी वस्तुस्थिती असातना जाणुनबुजून खरी वस्तुस्थिती मे. कोर्टापासुन लपवुन ठेवलेली आहे. तसेच अर्जदार नं. १ हिचे वडील मुंबई येथे पोलीसामध्ये नोकरीस असल्याने अर्जदार नं. १ हि ही मुंबई या

ठिकाणी वास्तव्यास होती. त्यामुळे मुंबईच्या वातावरणामध्ये अर्जदार नं. १ ही राहिल्याने अर्जदार नं. १ हिची गावाकडे राहण्याची इच्छा नव्हती त्यामुळे अर्जदार नं. १ हिने अर्ज कलम ९ ते ११ मधील केलेली कथने ही काल्पनिक असुन वडील पोलीस खात्यामध्ये नोकरीस असल्याचा गैरफायदा घेवुन व कायदयाची माहिती असल्याचा गैरफायदा घेवुन खोटया मजकुराचा अर्ज केलेला आहे. या कारणावरूनही अर्जदाराचा अर्ज नामंजुर करणेत यावा ही विनंती केली आहे.

११. सामनेवाला याने पुढे असे कथन केले की, अर्जदाराचे अर्ज कलम १२ ते १७ मधील संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असुन तो या सामनेवाला यांना मान्य व कबुल नाही. अर्जदार नं. १ यांना नांदविणेस सामनेवाला नं. १ व त्याचे कुटुंबातील लोकांनी पै, पाहुणे, मित्र परिवार यांचेमार्फत अनेकवेळा प्रयत्न केले. परंतु अर्जदार नं. १ ही अर्जदार नं. २ मुलगी नम्रतास घेवुन मार्च २०१७ पासुन घरातुन निघुन माहेरी गेली ती आजपर्यंत आलेली नाही. तसेच अर्जदार नं. १ ही मुंबई सारख्या मोठ्या शहरातील वातावरणात राहिली असलेने अर्जदार नं. १ हिस गावाकडे राहण्याचे नसल्याने अर्जदार नं. १ ही माहेरी निघुन गेली आहे. त्याचप्रमाणे अर्जदार नं. १ व सामनेवाला नं. १ याचे संसारामध्ये अर्जदार नं. १ हिचे आई वडीलांचा जास्त हस्तक्षेप होत होता व अर्जदार नं. १ हिस तिचे आई वडील फिरवत होते व सामनेवाला व त्याचे कुटुंबियांना धमकी देत होते ही बाब हिने लपवुन ठेवलेली आहे. अर्जदार नं. १ हिस तिचे आई वडील सामनेवाला नं. १ व त्याचे कुटुंबातील भाउ, भावजय, मेहुणे हे अनेकवेळा जावुनही नांदवणेस पाठविलेले नाही. उलट अर्जदार नं. १ ही व तिचे आई वडील सामनेवाला नं.

१ यास म्हणत असे आमची मुलगी मुंबईमध्ये राहिली आहे, गावाकडेच लोकांचेत तिचे लग्न करून आम्ही फसलो आहे, आम्ही तिला नांदवणार नाही" अशी भाषा केली. तसेच सामनेवाला नं. १ याच्या बहिणी विदया, संध्या व शोभा दि. ६/७/२०२३ रोजी कधीही अर्जदार नं. १ हिचे माहेरी रहिमतपुर येथे गेलेले नसताना सामनेवाला नं. १ यांच्या बहिणीचेविरुध्द कोणतीही घटना घडली नसताना खोटया तक्रारी रहिमतपुर पोलीस स्टेशनला केलेली आहे. तसेच सामनेवाला नं. १ याचे मौजे पुसेगांव या ठिकाणी एकत्र कुटुंबातील जमीन २ एकर असुन ती पुर्णपणे जिराईत असुन शेतीतुन कोणत्याही प्रकारचे उत्पन्न निघत नाही. त्यामुळे अर्जदार नं. १ यांनी अर्जामध्ये जाणुन बुजून चुकीचे व काल्पनिक उत्पन्नाचा रक्कमा टाकलेल्या असुन सामनेवाला नं. १ यांची अर्जदार नं. १ हिस पोटगी देण्याची ऐपत नाही याची माहिती अर्जदार नं. १ हिस आहे. सामनेवाला नं. १ हा अर्जदार नं. १ व २ यांना अनेकवेळा मौजे पुसेगांव येथे नांदणेसाठी स्वतःहुन अनेकवेळा समक्ष अगर मध्यस्थामार्फत प्रयत्न केले. परंतु अर्जदार नं. २ मुलगी नम्रता हिस सन मार्च २०१७ पासुन कधीही घेवून आली नाही. उलट अर्जदार नं. १ हिने स्वतःहुन सामनेवाला नं. १ याचा परित्याग केलेला आहे. सामनेवाला नं. १ यांनी अर्जदार नं. १ हिस सन्मानाची वागणुक दिली. तिचे मुलीप्रमाणे सामनेवाला नं. १ याचे आई वडील, भाउ, भावजय यांनी लाड केले. परंतु अर्जदार नं. १ हिने सामनेवाला नं. १ व त्याचे कुटुंबातील लोकांची कदर केली नाही. वारंवार त्याचा अपमान केला. तसेच अर्जदार नं. १ हिने पत्नी म्हणुन कोणतेही कर्तव्य पार पाडलेले नाही. उलट अर्जदार नं. १ हिने सामनेवाला नं.१ कुटुंबात कौर्याची वागणुक दिली, मानसिक, शरिरीक, आर्थिक

त्रास दिला. अर्जदार नं. १ हिचे कोणतीही मुळ कागदपत्रे सामनेवालाकडे नाहीत. सबब या कारणावरून अर्जदाराचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा ही विनंती.

१२. सामनेवाला याने पुढे असे कथन केले की, अर्जदारचे अर्ज दाखल करणेचे कारण हे धादांत खोटे व लबाडीचे असुन अर्जदार नं. १ यांनी स्वतःहुन मार्च २०१७ रोजी सामनेवाला नं. १ याचे घरातुन निघुन गेलेली असुन परित्याग केलेला आहे. त्यामुळे अर्ज दाखल करणेस दिलेले कारण चुकीचे व काल्पनिक असल्याने या कारणावरूनही अर्जदाराचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा ही विनंती.

१३. सामनेवाला याने पुढे असे कथन केले की, अर्जदाराची अर्जामधील विनंती कॉलम अ ते ई मधील संपूर्ण मागणी ही चुकीची, कायदयाचे विरुध्द असुन अशा प्रकारची मागणी अर्जदार यांना करता येणार नाही. तसेच सामनेवाला नं. १ याची सदरची मागणी पुर्ण करण्याची ऐपत नाही. याउलट अर्जदार नं. १ हिची माहेरची आर्थिक परिस्थिती चांगली असुन अर्जदार नं १ हिचे वडील निवृत्त पोलीस अधिकारी असुन त्यांना पेन्शन र.रू. ५०,०००/– मिळते. तसेच रहिमतपुर गाव हे बागायत जमिनी असुन त्यापासुन दरवर्षी १० ते १५ लाखाचे उत्पन्न घेतात त्यामुळे अर्जदार नं. १ ही अर्जदार नं. २ मुलगी नम्रता हिस घेवुन माहेरी मजेत राहत आहे. यावरूनही अर्जदाराचा संपूर्ण अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे.

१४. सामनेवाला याने पुढे असे कथन केले की, अर्जदाराचे अंतरीम पोटगी अर्ज कलम १ ते ४ मधील संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असुन तो या सामनेवाला यांना मान्य व कबूल नाही. अर्जदार नं. १ ही मुलगी नम्रता हिस घेवुन आनंदात तिचे

आई वडीलांकडे राहत आहे. याउलट सामनेवाला नं १ हा साधा माणुस असुन तो शेतमजुरी करून त्याचे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसाबसा करीत आहेत. सामनेवाला नं. १ याची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे. त्यामुळे अर्जदार यांना सामनेवाला नं. १ यांना पोटगी मागण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही. वरील सर्व कारणांचा विचार करुन अर्जदारांचा तात्पुरती पोटगी मिळणेसाठीचा अर्ज नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

१५. दोन्ही पक्षकारांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद, अर्जामधील कथने व सामनेवालाचे म्हणणे याचा विचार करता खालील मुद्दे उपस्थीत होतात. सदर मुद्दयांवरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे–

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदार ही सामनेवाला क्र. १ याच्याकडून तिच्याकरीता व मुलीकरीता अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास अंतरीम पोटगीची रक्कम किती ? | होय.<br>तिच्याकरीता दरमहा रक्कम रुपये २,५००/– व मुलाकरीता रक्कम रुपये २,५००/– व दरमहा घरभाडे रुपये २०००/– |
| २) | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

१६. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिच्याबरोबर त्याचा विवाह झाल्याची बाब मान्य केली आहे. तसेच अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांनी एकत्रीत सहजीवन

व्यतीत केले असून त्यांना एक मुलगी झालेली आहे.

**<u>मुद्दा क्र. १ व २ करीता–</u>**

१७. कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा कलम २३ नुसार अंतरीम पोटगीचा अर्ज निकाली काढताना अर्जदार ही सामनेवाला याचे पासून कौटुंबिक हिंसाचाराने पिडीत असल्याची बाब प्रथमदर्शनी शाबित करणे गरजेचे आहे. अर्जदार हिने असे कथन केले आहे की, ती सामनेवाला यांनी केलेल्या कौटूंबिक हिंसाचारामुळे तिच्या माहेरी रहात आहे. सामनेवाला क्र. १ याचे असे कथन आहे की, अर्जदार ही स्वतःहून तिच्या माहेरी निघून गेलेली आहे व तिने स्वतः सामनेवाला क्र. १ याचा त्याग केला आहे. प्रस्तुतचा अर्ज संरक्षण अधिकारी यांनी दाखल केलेला असून कौटूंबिक घटना अहवाल देखील दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता अर्जदार हीच्या कथनांना पुष्टी मिळते.

१८. अर्जदार व मुलीच्या पालनपोषन करण्याची जबाबदारी सामनेवाला क्र. १ याची आहे. अर्जदार ही तिच्या मुलीसह माहेरी रहात असून सामनेवाला क्र. १ याने त्यांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. त्यावरुन प्रथमदर्शनी सामनेवाला क्र. १ याने अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार केला असे प्रथमदर्शनी दिसून येते.

१९. अर्जदाराने प्रथमदर्शनी सामनेवालाकडून होणारा कौटूंबिक हिंसाचार शाबित केला आहे. अर्जदार ही मुलीसह माहेरी रहात आहे. त्यांच्या उदरनिर्वाहाची व राहण्याची व्यवस्था करणे ही सामनेवाला क्र. १ याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी

आहे. परंतु त्याने तशी कोणतीही व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे मी या निष्कर्षास आले आहे की, अर्जदार ही सामनेवाला क्र. १ याच्याकडून अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे.

२०. अर्जदार हीचे असे कथन आहे की, सामनेवाला यांना पुसेगाव येथे ८ एकर बागायती जमीन असून त्यापासून त्यांना वार्षीक ८ ते १० लाख इतके उत्पन्न मिळते. उलटपक्षी, सामनेवाला क्र. १ याचे असे कथन आहे की, तो साधा माणुस असुन तो शेतमजुरी करून त्याचे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसाबसा करीत आहेत. तसेच सामनेवाला नं. १ याचे मौजे पुसेगांव या ठिकाणी एकत्र कुटुंबातील जमीन २ एकर असुन ती पुर्णपणे जिराईत असुन शेतीतुन कोणत्याही प्रकारचे उत्पन्न निघत नाही. सामनेवालाकडे उत्पन्नाचे काहीही साधन नाही. परंतु, त्याने त्याच्या म्हणण्यामध्ये तो मजुरी करुन उत्पन्न मिळवत आहे असे नमुद केले आहे. तसेच त्याने त्याचे म्हणण्यामध्ये त्याला एकत्र कुटुंबातील जमीन २ एकर जिराईत जमीन आहे असे कथन केले आहे. तसेच त्याने त्याचे म्हणण्यामध्ये अर्जदार सोडून त्याच्यावर इतर कोणाचीही जबाबदारी असल्याबबात कथन केले नाही.

२१. अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला क्र.१ याच्या नावे असणा–या सातबारा उता–याच्या प्रती पटलावर दाखल केल्या. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की सामनेवाला क्र.१ याचे नावे व त्याचा भाऊ शंकर वसंत जाधव यांच्या नावे समाईक जमीनी गट क्र.१०५८ क्षेत्र ०.३०५० आर, गट क्र.१०६७ क्षेत्र ०.२३७५ आर, गट क्र.१०७८ क्षेत्र ०.३२.५० आर, गट क्र.११८८ क्षेत्र ०.९०० आर, गट

क्र.१२०८ क्षेत्र ६७ आर, गट क्र.१२१० क्षेत्र २२ आर, गट क्र.१२४८ क्षेत्र २९ आर, गट क्र.१५२२ क्षेत्र ०.०२७५ आर तसेच सामनेवाला क्र.१ त्याचा भाऊ व बहिणी यांच्या मध्ये गट नं.९ मधील क्षेत्र ०.०२०० आर, गट नं.१३५८ क्षेत्र ०.०७०० आर, गट नं.१२०० क्षेत्र ०.०२१ आर अशा शेतजमीन मिळकती सामील आहेत. सामनेवाला क्र.१ याचा वरील प्रमाणे असणा–या शेतजमीनीमध्ये हिस्सा असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे तो वरीलप्रमाणे शेतजमीनीवर आले, बटाटा, ज्वारी, सोयाबीन इत्यादी पिके घेत असल्याचे देखील दिसून येते. म्हणजेच सामनेवाला क्र.१ याला उत्पन्नाचे साधन असल्याचे व तो अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.२ यांना अंतरिम पोटगी देवू शकत असल्याचे या ठिकाणी दिसून येते.

२२. अर्जदार हीस उत्पन्नाचे साधन आहे व ती स्वतःचा चरितार्थ चालवू शकते याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा सामनेवाला क्र. १ याने अभिलेखावर दाखल केलेला नाही. एकंदरीत, अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांची परिस्थीती आणि सध्याची सामाजीक परिस्थीती पाहता सामनेवाला क्र. १ याने अर्जदार व मुलगी नम्रता यांच्या उदनिर्वाहासाठी दरमहा रक्कम रुपये २,५००/– प्रत्येकी अंतरीम पोटगी व घरभाडे करीता रुपये २०००/– देण्याचा आदेश योग्य व न्यायोचीत वाटतो. सबब, मुद्दा क्र. १ करीता मी वरीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे –

## आदेश

(१) अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

(२) सा. क्र. १ याने अर्जदार व मुलगी नम्रता यांना त्यांच्या उदरनिर्वाहाकरीता प्रकरण दाखल केल्यापासून अंतिम निकाल लागेपावेतो अंतरीम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रुपये २,५००/– प्रत्येकी (रु. दोन हजार पाचशे प्रत्येकी) व घरभाडे करीता रुपये २०००/– दयावेत.

(३) सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR

Digitally signed by PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR
Date: 2025.07.03 14:48:23 +0530

स्थळ – कोरेगाव ( पी.डी.यवतकर )

दि. ०१/०७/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोरेगाव.